(28)

।। ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे ।। ग्रामपंचायत कर भरणे हे आद्य कर्तव्य ।।
।। पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना राबवा, गावचा विकास घडवा ।।

# ग्रामपंचायत कार्यालय, किन्ही-बहिरोबावाडी

ता.पारनेर, जि.अहमदनगर

सरपंच
सौ.जयश्री किरण खोडदे

उपसरपंच
श्री.हरेराम आत्माराम खोडदे

ग्रामपंचायत किन्ही * स्थापना १९५९ * ता.पारनेर,जि.अहमदनगर

## निवेदन

दि. ०४/०९/२०२४

मा. निलेश लंके साहेब

खासदार, दक्षिण अहिल्यानगर मतदार संघ

अर्जदारः- समस्त ग्रामस्थ बहिरोबावाडी आणि किन्ही, ता. पारनेर

विषयः- बहिरोबावाडी ते लम्हाणबाबा मंदिर या ४ कि. मी. रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण होणे बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, बहिरोबावाडी ते लम्हाण बाबा मंदिर हा रस्ता अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. किन्ही आणि बहिरोबावाडी येथील जवळपास ५० % शेतकऱ्यांची शेती आणि वस्ती या रस्त्यावर अवलंबून आहे. परंतु या रस्त्याव्यतिरिक्त दुसरा कोणताच रस्ता शेतीत आणि वस्तीवर जाण्यासाठी नाही. पावसाळयामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यसाठी मोठी कसरत करावी लागते. गावा जवळील ओढयाला कुठल्याच प्रकारचा पुल नाही. तसेच शेतातील शेतमाल बाजारपेठेत ने आण करता येत नाही. आजारी पेशंट आणि वृध्दांना दवाखाण्यात नेण्यासाठी खुप अडचणी येतात. या रस्त्या अभावी अनेक पेशंट दगावल्याच्या घटना आता पर्यंत घडलेल्या आहेत. तेव्हा कृपया हा रस्ता खंडीकरण व डांबरीकरण व्हावा. ही आपणास नम्र विनंती.

आपला विश्वासु
J.K. Khodade
सरपंच
ग्रामपंचायत किन्ही
ता. पारनेर, जि. अहमदनगर